शिवसेना

खासदार चंद्रकांत खैरे
शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# समर्थनगर येथे शहर स्वछता अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**संभाजीनगर ( ता.२६ ) :** सुंदर शहर, स्वच्छ शहर कायम ठेवण्यासाठी स्मार्ट सिटीच्या दिशेने पाऊल टाकलेल्या शहराला आपला हातभार लागावा. म्हणुन वॉर्ड क. ६८ समर्थनगर येथे नागरिकांनी शहर स्वच्छता अभियानाला उत्स्फुर्त प्रतिसाद देत सर्वांनी भाग घेत आपआपला परिसर स्वच्छ केला. या अभियानाला पालकमंत्री रामदास कदम, शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे, जिल्हाधिकारी निधी पांडे, महापौर त्र्यंबक तुपे, जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, सुहास दाशरथे, नगरसेवक ऋषिकेश खैरे, आनंद तांदुळवाडीकर यांची उपस्थिती होती. पुष्पनगरी येथील नाना-नानी पार्क उद्यानाला भेट देऊन स्थानिक नागरिकांचे कौतुक पालकमंत्री रामदास कदम यांनी केले. तसेच सिल्लेखाना येथील कत्तलखाना बंद करण्याचे पालकमंत्री रामदास कदम यांनी पोलीस निरिक्षक गोवर्धन कोळेकर यांना आदेश दिले.

सकाळी ६ वाजेपासुन नागरिकांची निराला बाजार, शारदाश्रम कॉलनी, दक्षिण समर्थनगर, उत्तर समर्थनगर, वरद गणेश मंदिर रोड, सावरकर चौक आदि परिसर स्वच्छ केला. समर्थनगर वॉर्डातील नागरिकांनी या अभिमानाचे स्वागत केले असुन नागरिकांच्या निरोगी आरोग्यासाठी चांगला उपक्रमामुळे शिवसेना-महानगरपालिकेला धन्यवाद दिले.

यावेळी आशुतोष डंख, किरण शर्मा, विनोद बोरखडे, सुधीर भाले, सुधीर जाधव, भुपेश पाटील, मयुर यादव, सचिन जोशी, संदिप कुंटे, राजु गरड, निलेश बोरखडे, भगतसिंग दरख, आदित्य राजपुत, अक्षय कुंटे, अण्णा वैद्य, सुंनदा पालोदकर, शैलेजा देव, अभय शहा, कांता गाढे, आदिंसह सामाजिक संस्था कार्यकर्ते नागरिकांची उपस्थिती होती.

प्रसिध्दी प्रमुख
गणेश वाघ / मनोज वडगावकर

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com
8421415255/9420404329 8484066606/9604384400